# आणखी एक मेट्रो मुंबईच्या वाटेवर



मेट्रो-३ ची रेक आंध्र प्रदेशच्या श्रीसिटीतून दाखल होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या देशातील पहिल्या वहिल्या भुयारी मेट्रो ३ मार्गावर धावणाऱ्या मेट्रोचा आणखी एक आठ डब्यांचा दुसरा रेक डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्याच्या आसपास रस्ते मार्गाने आंध्र प्रदेशमधील श्रीसिटीहून मुंबईत दाखल होणार आहे. तत्पूर्वी, एक रेक काही महिन्यांपूर्वीच मुंबईत दाखल झाला असून, या रेकची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून चाचणी करण्यात येत आहे.

मेट्रो ३ मार्गावर धावणारे स्टेनलेस स्टीलचे हे मेट्रोचे डबे किमान ३५ वर्षे टिकतील, असा दावा कॉर्पोरेशनने केला आहे. ट्रेनच्या छतावर स्थित व्हेरिएबल व्होल्टेज व्हेरिएबल फ्रिक्वेन्सी प्रणालीद्वारे वातानुकूलन यंत्रणेचे नियंत्रण केल्याने ४ ते ५ टक्के ऊर्जा बचत होईल. एका गाडीतून २४०० प्रवासी प्रवास करू शकतील. ८५ किमी प्रतितास अशा वेगामुळे प्रवाशांचा वेळ वाचणार आहे.

मुंबई मेट्रो मार्ग ३ ची एकूण लांबी ३३.५ किमी आहे. २६ भुयारी आणि एक जमिनीवरील अशी २७ स्थानके आहेत. नरिमन पॉईंट, वरळी, वांद्रे - कुर्ला संकुल व आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विमानतळ, मरोळ औद्योगिक वसाहत, सीप्झ अशी महत्त्वाची केंद्रे मेट्रोने जोडली जातील. कुलाबा ते आंतरराष्ट्रीय विमानतळ ५० मिनिटांत करणे सहज शक्य होणार आहे.

| | | |
|---|---|---|
| **पहिला टप्पा कधी?** | बीकेसी ते सीप्झ हा पहिला टप्पा | **जून २०२३** दरम्यान सुरू होणार |

**किती प्रवासी प्रवास करणार?**

मेट्रो ३ च्या पूर्णत्वानंतर **१७,००,०००** प्रवासी प्रवास करू शकणार.



**कुठे होते चाचणी?** मुंबई मेट्रो लाईन ३ ची सिप्झ (सारिपुतनगर) येथील रॅम्प ते मरोळ नाक्यादरम्यान सुमारे ३ किमी अंतरावरील डाऊन मार्गावर डिझाइन सिद्ध करणारी ट्रेन चाचणी केली जात आहे.